# एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ

एक छोटीशी घटना. म्हणाल तर थोडीशी करमणुकीची, साहसी पण बरेच काही सांगून जाणारी बोधप्रद घटना.

ग्रामीण भाग. खेडयातील नदीकिनारीचे एक छोटेसे गाव. गावाच्या वेशीलगत नदीकिनारी एक छोटेसे मंदिर. मंदिराची उंची जेमतेम ७ ते ८ फूट. देवळाभोवती छानसा बांधलेला ओटा. मंदिराजवळच एक दोन फुला फळांची झाडे व एक गुलमोहराचे मोठे जुनाट झाड. त्याच्या पसरलेल्या विस्तीर्ण फांद्या झाडाच्या खाली पुर्जायाचे छोटेसे टुमदार झोपडी वजा कौलारू घर. मंदिरा भोवती सदैव वास्तव्यास असणारी नेहमीची दोन चार कुत्री, मांजरं व ५/१0 माकडे, असा हा विलोभनीय परिसर.

भाविक येतात, दर्शन घेतात व प्रसादरूपी शिदोरी ठेउन जातात. भाविकांनी वाहिलेला प्रसाद, झाडांची फळें फुले खाउनच हे हनुमंताचे वारस व इतर प्राणीमात्र आपली गुजराण करित. दर्शना नंतर 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी तेणे मुक्ती चारही साधियेल्या' या संत उपदेशा प्रमाणे घडीभर ओटयावर बसतात, विश्राम करतात, व निसर्गाची मजा लूटतात. माकडांच्या उडया, माकड चेष्टा पाहून घडीभर सर्व विसरून मनोरंजन करून घेतात.

नेमेची येतो मग पावसाळा या उक्ती प्रमाणे पावसाळयाचे दिवसात पाऊस आला. गेल्या दोन तीन दिवसात पाऊस जरा जास्तच झाल्याने नदीच्या पाण्याची पातळी वाढली होती. नदीला पूर आला. मंदिर चहूबाजूंनी पाण्याने वेढले. नदी, नाले भरभरून वाहू लागले. गावात सर्वत्र लहान मोठे पाण्याचे डबके साचले. कधी नव्हे तो आलेल्या पुराच्या पाण्यामुळे रूंदावलेले नदीचे पात्र पाहण्यास गावातील आबाल वृध्दांची नदीकिनारी गर्दी झाली. सर्वांना याचे अप्रूप व कुतुहल वाटत होते. याबरोबर मनात थोडीशी भीती पण होती. नितनियमित देव दर्शनाला येणारी काही मंडळी पाण्याची वाढलेली पातळी पाहून दुरूनच देवदर्शन घेत होती. कुत्री मांजरं तर केव्हाच निघून गेली. पण झाडांवर वास्तव्यास असणा-या वानरसेनेस त्याचे काहीच सोयरे सुतक नव्हते. नेहमी प्रमाणे सर्व माकडे आपल्या पिलांसह इकडून तिकडे उडया मारित व माकड चेष्टा करित जिवनाचा आनंद उपभोगीत होती.

जस जसे पाणी वाढू लागले तस तशी सर्व माकडे स्व संरक्षणार्थ मंदिराचे कळसावर चढली. थोडयाच वेळात माकडांचा बाहेर येण्याचा मार्ग बंद झाला. कळसापासून काही फूट अंतरावर पाण्यावर असलेली फांदी, हा एकच मार्ग उरला होता. माकडांची अस्वस्थता वाढत चालली होती. ती दात विचकीत 'खी खी' असा विचित्र आवाज करित जणू मदतीचा हात मागत होती. या परिस्थितीमध्ये सर्व हतबल झाल्याचे दिसत होते. माकडांमधील चल बिचलता वाढू लागली. तीरावरील पाहणा-यांच्या मनात धडकी भरली. प्रत्येकाच्या मनात एकच भीती. आता ही माकडे पाण्याच्या लोंढया बरोबर वाहून जाणार.

तितक्यात त्यांच्यातील एका माकडाने धाडसाने कळसावरून फांदीवर उडी मारली व फांदी पकडली. काही क्षण तो तेथेच थांबला, खीऽ खीऽ असा आवाज काढून तो जणू इतरांना असे साहस करण्यास प्रोत्साहित करत होता. क्षणातच दुसरी उडी मारून पुर्जायाच्या घराच्या छतावर विसावला. त्याची ही कृती पाहून दुस-याने, नंतर तिस-याने असे एका पाठोपाठ एक करित सर्व घराच्या छतावर येउन बसले.

हे पाहत असतांना पाहणा-याची थोडीफार करमणूक झाली पण कळसावरून फांदीवर उडी मारणारे माकड फांदीवर येईपर्यंत सर्वांचे श्वास रोखले जात होते.

आपण म्हणाल यात विशेष ते काय? माकडे ती माकडेच. उडया मारणार, माकड चेष्टा करणार, नाही तर काय करणार! पण त्यांची माकड चेष्टा सोडल्यास त्या माकडांमध्ये साहस, एकता व सहयोग करण्याची वृत्ती दिसून आली.

माकडे ही माणसाची पूर्वज समजली जातात. माणूस आणि माकड यात फरक एवढाच की, माकडाला शेपूट आहे तर माणसास शेपूट नाही. पण माणसाकडे परमेश्वराने दिलेली विचार शक्ती ही फार मोठी देणगी आहे. काय चांगले, काय वाईट याचा सारासर विचार करू शकतात. माणसाने माकडांच्या या कृतीतून साहस व एकता हे गुण घेण्यासारखे आहेत.

ही घटना नजरेसमोरून सरते न सरते तोच या समान घटना नजरेस पडली. पावसामुळे रस्त्यावरील खाच खळगे पाण्याने भरले होते. या खळग्यातून वाट काढणे जरा जिकीरीचे होते. पुराचे पाणी पाहण्यास आलेले काही तरूण कसेबसे उडया मारून निघून गेले पण मागे राहिलेले वयस्कर माणसे धडपडत वाट काढण्याचा प्रयत्न करित होती. तसे पाहिले तर युवक वृध्दांना वाट काढण्यात मदत करू शकले असते. त्यांना प्रोत्साहित करू शकले असते. परंतु असे न करता ते निघून गेलेत.

कीती हा विरोधाभास ! किती ही विसंगती ! 'सत्संगती सदा घडो सृजन वाक्ये कानी पडो', 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ', 'विना सहकार नही उध्दार' अशी बोध वाक्ये केवळ बोलण्या व वाचण्या पुरतीच का ? असे वाटले व 'माणसा परास माकडे बरी 'म्हणायची वेळ आली.